# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(दुपार)

**दिनांक १२.१०.२०२६ सोमवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक ११.१०.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ कायद्यान्वये ०५ केसेसमध्ये ०५ ईसमावर कारवाई करून एकुण ११,९००/—रू. चा मुद्देमाल जप्त केला. जुगार कायद्यान्वये ०१ केसमध्ये ०३ ईसमावर कारवाई करून एकुण ११,४५५/—रू. चा मुद्देमाल जप्त केला. तसेच, दिनांक ११.१०.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक १२.१०.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये ०२ इसमांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

**वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये सिग्नल जंपींग कलम २३९/१७७ मोवाका अन्वये ९६ केसेस, विना परवाना वाहन चालविणे कलम १३० मोवाका अन्वये ७६ केसेस, ऑन रोड पार्कीग कलम १२२/११७ मोवाका अन्वये १४७ केसेस, रॉग साईड कलम ४/१२२ मोवाका अन्वये ८५ केसेस, अवैध प्रवासी वाहतुक कलम १९४(ए) मोवाका अन्वये ६६ केसेस, ड्रायव्हींग विदाऊट युनिफार्म कलम २१/१८ मोवाका अन्वये ०६ केसेस, ट्रिपलसिट वाहन चालविणे कलम १२८/१७७ मोवाका अन्वये १७१ केसेस, धोकादायकरित्या बेदरकारपणे वाहन चालविणे कलम १८४ मोवाका ११ केस, फॅन्सी नंबरप्लेट कलम ५१/५० सीएमव्हीआर अन्वये १४ केसेस, विदाऊट सिटबेल्ट ड्रायव्हींग कलम १९४ बी(१) मोवाका अन्वये ०२ केसेस, विना हेल्मेट गाडी चालविणे कलम १२९/१७७ मोवाका अन्वये ८५४ केसेस, वाहन चालवितांना भ्रमणध्वनीचा वापर करणे १६ केस, ड्रंकन ड्राईव्ह कलम १८५ मोवाका अन्वये २९ केसेस व इतर कलमांखालील वेगवेगळे गुन्हे असे एकुण १,६५६ वाहन चालकांवर कारवाई करून त्यांचेकडून एकूण रू. १०,०६,७२०/—रू. इतके तडजोड शुल्क वसूल केले आहे.**

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) लकडगंज पोलीसांची कामगिरी :— हद्दपार ईसमास शस्त्रासह अटक.**

दिनांक ११.१०.२०२६ चे १५.३० वा. चे सुमारास, लकडगंज पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहीती मिळाली की, गंगाजमुना वस्ती, हिररांझा बार मागे एक निळ्या पांढऱ्या रंगाचा शर्ट व जिन्स पॅन्ट घातलेला इसम शस्त्रासह फिरत आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, नमुद ठिकाणी गेले असता, तेथे प्राप्त वर्णनाचा इसम पोलीसांना पाहुन पळुन जात असता, त्यास पाठलाग करून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव निलु उर्फ निलेश विलासदास सोनवानी, वय २३ वर्षे, रा. मासुरकर चौक, राठीचे घरी किरायाने, नागपूर असे सांगीतले. त्याची

अंगझडती घेतली असता, त्याचे कंबरेत एक धारदार लोखंडी चाकु मिळून आला. त्यास पोलीस ठाणे येथे आणुन, त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०३ यांचे हद्दपार आदेश क्र. ०४/२०२४ नुसार आदेश तामील दिनांक ०४.०३.२०२६ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने शस्त्रासह समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे लकडगंज येथे आरोपीविरूध्द कलम १४२, १३५ म.पो.का., सहकलम ४,२५ भा. ह.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. आरोपीचे ताब्यातुन चाकु किंमती ३००/—रू. चा जप्त करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राहुल मदने पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ३), मा. श्री. शिवप्रसाद पारवे सहा. पोलीस आयुक्त (लकडगंज विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. मुकुंद कवाडे, पोउपनि. सागर शिंदे, पोहवा. निलेश घायवट, सतिष निमजे, पोअं. प्रभाकर, शकील, देवेंद्र, नौशाद व रूपेश यांनी केली.

**३) गुन्हेशाखा पोलीसांची कामगिरी :— देहव्यवसाय करवुन घेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ११.१०.२०२६ चे १४.१७ वा. ते १७.३० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा सामाजीक सुरक्षा विभाग व अनैतिक व्यापार प्रतीबंधक पथकातील अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असतांना, त्यांना मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीत, हॉटेल रॉयल मेन्शन, प्लॉट नं. ६, चंद्रभागा सोसायटी, पवनपुत्र नगर, नागपूर येथे पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, तेथे महिला नामे समीना वसीम शेख, वय ४४ वर्षे, रा. श्रीकृष्ण नगर, प्लॉट नं. ४८, नंदनवन, नागपुर ही पीडीत महिला हिला देहव्यवसायाकरीता प्रवृत्त करून, स्वतःचे आर्थिक फायद्याकरीता ग्राहकांना व पिडीत महीलेस देहव्यापाराकरीता जागा उपलब्ध करवून देहव्यवसाय करवुन घेताना समक्ष मिळुन आली. आरोपीचे ताब्यातुन ०१ पिडीत महीलेची सुटका करण्यात आली. पिडीत महिला ही मध्य प्रदेश राज्यातील असल्याचे निष्पन्न झाले. आरोपीचे ताब्यातुन रोख २,०००/—रू., ०१ मोबाईल फोन व इतर साहित्य असा एकुण किंमती १४,५१०/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीविरूध्द पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे कलम १४३(२) भा.न्या.सं., सहकलम ३,४,५ अनैतिक देहव्यापार प्रतिबंधक अधिनीयम अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. आरोपी व पिडीत महिलेस मुद्देमालासह पुढील कारवाईस्तव हुडकेश्वर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले.

वरील कामगिरी मा. श्री. राजेंद्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), मा. श्री. दीपक अग्रवाल पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. दर्शन पाटील व सामाजीक सुरक्षा विभाग व अनैतिक व्यापार प्रतीबंधक पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी संयुक्तीकरित्या केली.



**४) यशोधरानगर पोलीसांची कामगिरी :— वाहन चोरी करणाऱ्या दोन आरोपींना अटक, ०४ गुन्हे उघडकीस.**

दिनांक ०७.१०.२०२६ चे ११.०० वा. ते दिनांक ०८.१०.२०२६ चे २३.५० वा. चे दरम्यान, फिर्यादी फैजान समशेर खान, वय २३ वर्षे, रा. नुरी मस्जीद जवळ, बेले नगर, कळमना, नागपूर यांनी त्यांची बर्गमॅन मोपेड क्र. एम.एच ४९ सि.आर ९२२७ किंमती ८०,०००/—रू. ची पोलीस ठाणे यशोधरानगर हद्दीत ऑटोमोटीव्ह चौक मेट्रो स्टेशन जवळील पान ठेल्याचे बाजुला लॉक करून, पार्क करून, ठेवली असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीची नमुद मोपेड चोरून नेली. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे यशोधरानगर येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासात, यशोधरानगर पोलीसांना मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, आरोपीस निष्पन्न केले. आरोपी नामे इम्रान हुसैन राशीद हुसैन, वय २२ वर्षे, रा. उस्मानियॉ मस्जीद मागे, हसनबाग, ह.मु— मोठा ताजबाग, सिंधीबन, सक्करदरा, नागपुर यास ताब्यात घेतले. त्यास वर नमुद गुन्हेसंबंधाने विचारपुस केली असता, त्याने त्याचा साथीदार नामे शेख सुल्तान शेख यासीन, वय २३ वर्षे, रा. फिरोज पान ठेल्यासमोर, सिंधीबन, मोठा ताजबाग, सक्करदरा, नागपुर याचेसह संगणमताने वाहनचोरी केल्याची कबुली दिली. आरोपींची सखोल विचारपुस केली असता, त्यांनी वर नमुद गुन्ह्याव्यतीरिक्त पोलीस ठाणे सक्करदरा हद्दीतुन सुझुकी एक्सेस १२५ क्र. एम. एच. ४९ सि.पी ३३७१ तसेच, होंडा ॲक्टीवा क्र. एम.एच ४९ सि.टी ७१४६ व पोलीस ठाणे नंदनवन हद्दीतुन ॲक्टीवा क्र. एम.एच ४९ सि.व्ही ९४९५ असे एकुण ०४ वाहनचोरीचे गुन्हे केल्याचे सांगीतले. आरोपींचे ताब्यातुन एकुण ०४ चोरी केलेले वाहने किंमती २,४५,०००/— रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी, सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री. नित्यानंद झा, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ५), मा. श्री. रोहीत ओव्हाळ, सहा. पोलीस आयुक्त (कळमना विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. युनुसचॉद शेख, दुपोनि. विवेकानंद भारती, पोउपनि. निळकंठ नन्नावरे, पोहवा. राजेश वासनिक, रवि आहीर, पोअं. अमोल भेंडेकर, लक्ष्मण पडवाल, रितेश दुधे व गजानन गेडाम यांनी केली.



**(गुन्हे)**

**पोलीस ठाणे पाचपावली :— शस्त्र बाळगणाऱ्या ईसमास अटक.**

दिनांक ११.१०.२०२६ चे १८.५५ वा. चे सुमारास, पाचपावली पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, स्वामी नगर, लाडपुरा, शंकर मंदीराजवळ एक इसम पोलीसांना पाहुन पळाल्याने,

त्याचा पाठलाग करून, त्यास ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव नितीन शामराव पौनिकर, वय ३३ वर्षे, रा. स्वामी नगर, पाचपावली, नागपूर असे सांगीतले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे कंबरेत एक धारदार लोखंडी सत्तुर किंमती ५००/—रू. चा मिळून आल्याने जप्त करण्यात आला.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने लोखंडी सत्तुर बाळगतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, सरतर्फे पोहवा. मिथुन चौरे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे पाचपावली येथे मपोउपनि. नुतन जाधव यांनी आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**स्वा/—**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**